दै. ~~[illegible]~~ उद्याचा मराठवाडा दि. 16.03.25

# कट्टा बाजारावर एलसीबीची टाच






संडे स्पेशल

राम तरटे

नांदेड - जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आबाधित ठेवण्यासाठी पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी फ्लश आऊट हे मिशन सुरू केले आहे. या मिशनअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने विनापरवाना शस्त्र बाळगणाऱ्या विरुद्ध कायद्याचा बडगा उगारला आहे. अवैध कट्टा बाजारवर एलसीबीने टाच आणली असून गत १४ महिन्यात ३१ आरोपींना ताब्यात घेत त्यांच्याकडून १९ पिस्टल आणि १६ जिवंत काडतुस जप्त करण्यात आली आहेत. पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेने ही कारवाई केली आहे.

कमरेला पिस्टल लावून सामाजिक जीवनात आपला धाक निर्माण करण्याची जणू स्पर्धाच लागल्याचे चित्र सध्या दिसून येते. नांदेड शहर व ग्रामीण भागातही कट्टा, पिस्टल बाळगणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. यात विधीसंघर्षित बालकांचाही समावेश आहे. गुन्हेगारी जगतात वावरणाऱ्या आणि या क्षेत्रात नव्याने आलेल्या किंवा येऊ पाहणाऱ्यांसाठी पिस्टल बाळगणे ही फॅशन झाली आहे. मध्यप्रदेश, बिहार, उत्तर प्रदेशातून आणून अगदी सहजपणे उपलब्ध होणाऱ्या गावठी पिस्टलची नांदेडमध्ये खरेदी विक्री केली जाते. या शस्त्राचा धाक दाखवून चोरी, लुटमार, वाटणारी केली जात आहे. गोळीबार करून खून केले जात आहेत. ही बाब जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी बाधा निर्माण करणारी आहे. त्यामुळे विनापरवाना शस्त्र बाळगणाऱ्याविरुद्ध धडक कारवाईचे आदेश पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते.

पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी आपल्या पथकाला योग्य त्या कारवाईच्या सूचना दिल्या. त्यानुसार जानेवारी २ ते फेब्रुवारी २०२५ या १४ महिन्याच्या काला एकट्या स्थानिक गुन्हे शाखेने तब्बल ३१ आर ताब्यात घेत त्यांच्याकडून १९ पिस्टल आणि जिवंत काडतुसे जप्त केली आहेत. भाग्यनगर प ठाण्याच्या हद्दीत एक, नांदेड ग्रामीण पोलीस ठ हद्दीतील ३, वजीराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दी शिवाजीनगर १, इतवारा २, विमानतळ १, अध आणि अन्य ४ असे १९ पिस्टल जप्त केले यांप्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यामध्ये गुन्हे करण्यात आले आहेत.

### पिस्टलची होते बिनबोभाटपणे खरेदी-विक्री

नांदेड शहर आणि जिल्ह्यात गावठी कट्टा आणि पिस्टल अगदी सहजरीत्या उपलब्ध होतात. उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, बिहारमधून येणाऱ्या या पिस्टल खरेदी विक्रीसाठी मोठी आर्थिक उलाढाल होते अशी ही चर्चा आहे. नांदेड शहरातील अनेक भागात विनापरवाना पिस्टल वापरणाऱ्यांची संख्याही वाढत आहे. ही बाब अत्यंत चिंतनिय अशी आहे. खरे तर पिस्टलचा हा बाजार मुळासकट उखडून काढण्याची गरज आहे.

**- प्रसाद वाघमोडे** नांदेड



**नांदेड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी आणि गुन्हेगारीला आळा घालण्याच्या अनुषंगाने विनापरवाना गावठी कट्टा, पिस्टल बाळगणाऱ्याविरुद्ध धडक कारवाईच्या सूचना स्थानिक गुन्हे शाखेसह सर्वच पोलीस ठाण्यांना देण्यात आल्या आहेत. या सूचनांचे पालन करत स्थानिक गुन्हे शाखेने गेल्या काही महिन्यात केलेली कारवाई निश्चितपणे चांगली आहे. स्थानिक गुन्हे शाखेसह अन्य पोलीस ठाण्यांनीही अवैध पिस्टल बाळगणाऱ्याविरुद्ध कारवाई केलेली आहे. भविष्यात ही कारवाई अधिक गतिमान केली जाईल.**

**- अविनाश कुमार**
पोलीस अधीक्षक, नांदेड





**पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेने गत १४ महिन्यात अवैधरित्या पिस्टल बाळगणाऱ्या ३१ आरोपींना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून १९ पिस्टल आणि १६ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. भविष्यातही वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई सुरुच राहील.**

**- उदय खंडेराय**
पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा